Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- IX | ISSUE- IV | APRIL | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# औषधी वनस्पतींचा खजिना असलेलं 'संजीवनी' बेट

**डॉ. ओमशिवा वि. लिगाडे,**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय नळेगाव. जि. लातूर

वडवळ नागनाथ लातूर जिल्ह्यातील चाकुर तालुक्यातील एक गाव आहे. ह्या गावाजवळच महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेले वनस्पती बेट आहे. त्यास संजीवनी भेट असेही म्हणतात. हे **संजीवनी बेट दुर्मिळ औषधींसाठी प्रसिद्ध आहे.** संजीवनी बेटाचे अनुमाने ३५ हेक्टर क्षेत्र आहे. गावाला लागूनच रेल्वे स्टेशन आहे. गावाच्या मधोमध नागनाथाचे मंदिर आहे. या मंदिरावरूनच या गावाचे नाव " वडवळ नागनाथ " असे पडले.(1)

प्रत्येक गावाला यात्रेची परंपरा असते. त्याचप्रमाणे चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ (ता. चाकुर जि. लातूर) येथे पण यात्रा महोत्सव असतो, पण तो व्याधीग्रस्तांचा. वनस्पतीचा खजिना असलेल्या या संजीवनी बेटावर उत्तर नक्षत्रात ही यात्रा भरते. मात्र, या ऐतिहासिक यात्रेवरही कोरोनाचे संकट आहे. यात्रेदरम्यानच्या तीन दिवसात येथील वनस्पतीचे सेवन केल्यावर कोणताही आजार बरा होतो अशी आख्यायिका आहे. त्यामुळेच या बेटाला संजीवनी बेट म्हणून ओळखले जात आहे. कोणत्याही यात्रेला परंपरा आणि ऐतिहासिक महत्व असते. पण चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथील संजीवनी बेटावरील यात्रेचे वेगळेपण आहे. हनुमान जेव्हा द्रोणागिरी पर्वत घेऊन उत्तरेकडून दक्षिणीकडे निघाले होते. तेव्हा या पर्वताचा एक तुकडा हा चाकूर तालुक्यातील या वडवळ नागनाथ येथे पडला होता. त्यामुळे या ठिकाणी वेगवेगळ्या वनस्पती असून त्याचा उपयोग विविध व्याधींवर केला जातो. त्यामुळेच या बेटाला संजीवन बेट म्हणून संबोधले जात आहे. उत्तर नक्षत्रात या ठिकाणी विविध व्याधींनी त्रस्त असलेले नागरिक येतात आणि तीन दिवस केवळ वनस्पतींचे सेवन करतात. त्यामुळे आजार बरे होतात अशी आख्यायिका आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश येथून प्रतिवर्षी सप्टेंबरमध्ये येणाऱ्या उत्तर नक्षत्रामध्ये या बेटावर विविध आजाराने पीडित असणारे रुग्ण, तसेच वैद्य यांचे येण्याचे प्रमाण पुष्कळ प्रमाणात वाढलेले आहे.

दरवर्षी या काळात हजारो भाविक या निसर्गरम्य वातावरणात येत असतात. परंतु, कोरोनाच्या संकटामुळे भाविकांची संख्या घटली आहे. या बेटावर महादेव मंदिर, हनुमान मंदिर एवढेच नाही तर देवीचे मंदिरही आहे. बेटाचे तीन टप्पे आहेत. सर्वात उंच, मध्यभागी आणि पर्वताचा पायथा अशा तिन्हीही ठिकाणच्या वनस्पती चाखल्यास आजार बरा होतो. विशेष म्हणजे या तीन दिवसांच्या काळात जेवण न करता या वनस्पती खाव्या लागतात. त्यामुळे कोणत्याही व्याधी दूर होतात असेही सांगितले जाते. या आगळ्या वेगळ्या घटनास्थळाला आतापर्यंत अनेकांनी भेटी दिल्या आहेत. या बेटाला पर्यटनचा क दर्जा मिळाला आहे. दुर्मिळ वनौषधीचा येथे खजिना असल्यामुळे दरवर्षीच्या उत्तरा नक्षत्रात पर्यटकांची अलोट गर्दी असते. वर्षभर या संजीवनी बेटाच्या पर्यटनस्थळाला राज्यातूनच नव्हे तर परराज्यातूनही पर्यटकांचा शाळा महाविद्यालयाच्या सहली भेट देतात.(2)

माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार संभाजी पाटीलनिलंगेकर हे देखील बेटावर आले होते. या ठिकाणी संशोधन केंद्र, आयुर्वेदिक महाविद्यालय, कायमस्वरूपी पाणीपुरवठा करून बेटाचा सर्वांगीण विकास केला जाणार असल्याचे सांगितले होते. मात्र, प्रत्यक्षात बेटावर जाण्यासाठी साधा रस्ताही झालेला नाही. पर्यटनाच्या योजना केवळ कागदावरच असून मूलभूत सोई-विधाही नाहीत हेच वास्तव आहे.(3)

**शासन आणि प्रशासन यांच्या दुर्लक्षामुळे या बेटावरील दुर्मिळ वनौषधी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. बेटाच्या संवर्धनासाठी केवळ समित्यांचे अहवाल घेऊन दप्तर**

**बंद ठेवण्यापेक्षा प्रत्यक्ष संवर्धन आणि संगोपन यांसाठी पुढाकार घेण्यात न आल्यास इतिहासामध्ये 'येथे दुर्मिळ वनौषधी वनस्पती होत्या...' असे वाचण्याची वेळ लातूर जिल्हा वासियांवर येण्याची शक्यता आहे. या बेटावरील वनौषधी वाढवणे, संगोपन आणि संवर्धन यांसमवेत संशोधनासाठी विशेष काम करण्याची आवश्यकता आहे.**

'मराठवाडा वैधानिक विकास महामंडळा'च्या वतीने वर्ष २००० मध्ये या बेटावर अभ्यासासाठी एक समिती पाठवण्यात आली होती. या समितीने काही उपाययोजनाही सुचवल्या होत्या; मात्र त्या सर्व 'दप्तर बंद' झालेल्या आहेत. या ठिकाणी पूर्णवेळ कार्यालय आणि कर्मचारी नियुक्त करून बेटावरील वनौषधीचे संगोपन आणि संवर्धन यांकडे लक्ष द्यावे. वनौषधींची नर्सरी चालू करण्यात यावी. त्यामुळे या ठिकाणी असणाऱ्या बेरोजगार युवकांना काम मिळेल. वनौषधींच्या संवर्धनासाठी सर्व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, असे सुचवण्यात आले होते; परंतु यासंदर्भात काहीही काम झालेले नाही. मराठवाड्यामध्ये 'नॅचरोपॅथी'चे केंद्र अन्यत्र कुठेही नाही. सुदैवाने वडवळ येथील संजीवनी बेटावर असणाऱ्या वनौषधींचा उपयोग करून या ठिकाणी 'नॅचरोपॅथी'चे केंद्र सहजपणे चालू करता येऊ शकते. त्यासाठी केवळ इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. येथील वनौषधींवर संशोधन करण्यासाठी या ठिकाणी प्रयोगशाळा उभारण्यात आल्यास त्याचा सर्वसामान्य जनतेस पुष्कळ लाभ होऊ शकतो. शासकीय औषधनिर्माण विभागास या बेटावरून सहजपणे कच्च्या मालाचा पुरवठा होऊ शकतो. लातूर, धाराशिव आणि नांदेड या ३ जिल्ह्यांतील आयुर्वेदिक महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन संवर्धन आणि संगोपन यांचे कार्य केल्यास महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होऊ शकतो. हे बेट वन विभागाच्या कह्यात आहे, तर बेटाच्या वरच्या भागाचा सातबारा वायरलेस विभागाच्या टॉवरसाठी चक्क नांदेड परिक्षेत्र पोलीस विभागाच्या नावे करण्यात आला आहे. बेटावरील संपूर्ण भागाचा सातबारा त्यांच्याकडे आहे. त्यामुळे औषधी बेट नेमके कोण आणि कसे जपणार ?, याकडे कुणाचेच लक्ष नाही. यावर जिल्हा प्रशासनाने आणि वन विभाग पर्यावरण समिती जिल्हा परिषद यांनी विचारविनिमय करून योग्य नियोजन केल्यास मोठा पारंपरिक वनऔषधींचा ठेवा जपला जाईल अन्यथा तो लोप पावण्याची शक्यता नाकारता येत नाही.(4)

संजीवनी बेटावर उपलब्ध असलेल्या दुर्मिळ औषधी वनस्पतीमध्ये गुडमार,उंदीरकानी, वासनवेल, गुळवेल, पिवळा धोत्रा, गुंज, रान लवंग, बहावा, रान मिरची, करटोली, रानतुळस, कारंज, अनंतमूल, वाघाटी, रान जाई, निर्गुडी, अघाडा, चंदन, शिवण, भुस्त्रान, काटक, केना, श्वेतसारिवा, सलपरणी, टाकली, बाला भेड, रोहित तरणा, लोखंडी, मदनफळ, दुर्वा, तुळस, रक्त पूर्णनावा, पूर्णनावा श्वेता, गोक्षुर, शंखपुष्पी, नाय, विष्णुकांता, आवर्तनी, अडुळसा, अश्वगंधा, शतावरी, ब्राह्मी, कार, तरवड, भारंगी, कार्र, शिवलिंगी, मका, भुईंबर, हेकल, चित्रक, रक्तरोहिडा, वंजारी, अरानी, रोषा घास, काळे तीळ, निम, घनेरी, कुर्डू, आघाडा, रामवड, अतीबला, खैर, खदिरवल्ली, बेल, कृष्ण शिरीष, सफेद शिरीष, कालमेघ, धावडा, दंती, अपटा, काळे तीळ, मारली मातंग, काटेसावर, चारोळी, पळस, पाच पानाचा पळस, काळी टाकला, सागरगोटे, गजगा, पाचुंदा, बहावा मालकांगणी, गोकर्णी, हळदवेल, महामुळ, भोकर, दहीपळस, वाय वर्ण, पांढरा ताग, खुळखुळा, अमरवेल सोमलता पांडू रंगा टेंभुर्णी मेडशिंगी पांगरा लाल पांगरा करड कोसला गुडमार अमरवेल, सोमलता, फनशी, दांडुस, शिसम, काकजंघा, टेंभुर्णी, मेडशिंगी, पांगारा लाल, पांगारा कोसला, मुरुडशेंग, खुरी, लोखंडी, बोंडारा, मेहंदी, कवठ, बारतोंडी, चित्रक, शमी, सोदंड, फांज भाजी, रिठा, बिबा, भिलावा, मांस रोहिणी, चिंच, अर्जुन, हेला, भेहडा, गवळण, कवांडल, मुरमाडी बाभूळ, काळा कुडा, पिंपळ, रामफळ, सीताफळ, बोर, घाट बोर, अग्निशिखा, काटे कोरांटी, रान कोरांटी, लाजाळू, आसना, तांबट, आठरून, महारुख, हूम्ब, मोई, चनबोर, येरोणी इत्यादींचा समावेश आहे.(5)



संजीवनी बेटावरील रामवड



संजीवनी बेटावरील औषधी वनस्पती 'मेढशिंगी'



संजीवनी बेटावरील पळस

**निष्कर्ष**

वडवळ नागनाथ येथील संजीवनी बेटावर अत्यंत दुर्मिळ वनस्पती आहेत. येथे दर वर्षी सप्टेंबर महिन्यात उत्तरा नक्षत्रामध्ये महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक येथून येणाऱ्या व्याधिग्रस्ताची यात्रा भरते. येथे येणारे लोक दिसेल ती वनस्पती खात असल्यामुळे तसेच शासन आणि प्रशासन यांच्या दुर्लक्षामुळे या बेटावरील दुर्मिळ वनौषधी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या बेटावर राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांचे श्रावण महिन्यामध्ये मोठे अनुष्ठान झाले होते. त्यानिमित्ताने परिसरातील खूप भाविक मंडळी बेटावर आलेली होती. तसेच मजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार संभाजी पाटील निलंगेकर हे देखील या बेटावर आलेले होते. मात्र येथील सुधारणांच्या दृष्टीने फारसे प्रयत्न झालेले नाहीत. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाच्या वतीने इसवी सन 2000 मध्ये या बेटावर अभ्यासासाठी एक समिती पाठविण्यात आली होती. या समितीने काही उपाययोजना सुचवल्या होत्या. मात्र त्या सर्व दप्तर बंद असल्याचे दिसून येते. मराठवाड्यामध्ये नॅचरोपॅथीचे केंद्र कुठेच नाही. सुदैवाने वडवळच्या संजीवनी बेटावर असणाऱ्या वनौषधींचा उपयोग करून घेऊन या ठिकाणी नॅचरोपॅथीचे केंद्र सहजपणे करता येऊ शकते फक्त त्यासाठी इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. येथील वनौषधी वर संशोधन करण्यासाठी या ठिकाणी प्रयोगशाळा उभारण्यात आली तर त्याचाही लाभ झाला असता. या बेटावर जाण्यासाठी साधा रस्ताही झालेला नाही कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याच्या सोयी नाहीत.

**संदर्भ**


1 https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B5%E0%A4%A1%E0%A4%B5%E0%A4%B3_%E0%A4%A8%E0%A4%BE%E0%A4%97%E0%A4%A8%E0%A4%BE%E0%A4%A5
2 कुंटे मोरेश्वर व सौ कुंटे विजया, देवदर्शन जिल्हा लातूर, मंदिर कोष प्रकाशन, पुणे, 2001, पृ. 93, 94.
3 https://www.lokmat.com/latur/sanjeevani-island-vadwal-marked-tourists-a693/
4 https://www.etvbharat.com/marathi/maharashtra/state/latur/grows-variety-of-medicinal-plants-in-sanjeevani-island-latur/mh20201001172335642
5 श्री. अभय मिरजकर, लातूर यांच्याकडून प्राप्त माहिती
6 https://www.saamana.com/latur-disrtict-sanjivani-hill-rarest-plants-to-be-disappear-soon/